शिक्षण मंडळ कराड, संचालित

# महिला महाविद्यालय कराड

## अर्थशास्त्र विभाग

## बहुपर्यायी प्रश्न

विषय - आर्थिक विचारांचा इतिहास पेपर II

बी.ए भाग - III सेम - VI

### मॉड्युल - I

### नव-सनातनवादी आर्थिक विचार

**1)** डॉ मार्शल यांच्या मते वस्तूचे मूल्य हे................ वरून निश्चित होते.

अ) मागणी ब) पुरवठा क) मागणी व पुरवठा ड) गुंतवणूक

**2)** अत्यल्प काळामध्ये वस्तूचे मूल्य कशावरून ठरते ?

अ) मागणी ब) पुरवठा क) मागणी व पुरवठा ड) गुंतवणूक

**3)** डॉ मार्शल यांनी वस्तूच्या मूल्य सिद्धांतामध्ये कोणता खर्च विचारात घेतला आहे ?

अ) बदलता खर्च ब) स्थिर खर्च क) बदलता व स्थिर खर्च ड) गुंतवणूक खर्च

**4)** डॉ मार्शल यांच्या मते अल्प काळामध्ये उत्पादक उत्पादन विषयक निर्णय घेताना......... खर्चाचा विचार करतो.

अ) स्थिर खर्च ब) बदलता खर्च क) सीमांत खर्च ड) सरासरी खर्च

**5)** डॉ मार्शल यांच्या मते दीर्घ काळामध्ये उत्पादक उत्पादन विषयक निर्णय घेताना पुढील खर्चाचा विचार करतो.

अ) स्थिर खर्च ब) बदलता खर्च क) सीमांत खर्च ड) सरासरी खर्च

**6)** प्रातिनिधीक उद्योगसंस्थेची संकल्पना कोणी मांडली आहे ?

अ) प्रा. पिगु ब) □डम स्मिथ क) डॉ मार्शल ड) रिकार्डो

**7)** ज्या उद्योग संस्थेचा.......... खर्च किमान असतो त्या उद्योग संस्थेला प्रातिनिधिक उद्योगसंस्था असे म्हणतात.

अ) सीमांत खर्च ब) सरासरी खर्च क) विक्री खर्च ड) उत्पादन खर्च

**8)** डॉ मार्शल यांच्या मते.........उद्योग संस्था सर्व उद्योग संस्थांचे नेतृत्व करते.

अ) खाजगी ब) सार्वजनिक क) प्रातिनिधिक ड) वरीलपैकी सर्व

**9)** प्रतिनिधीक उद्योगसंस्थेला पुढीलपैकी कोणते लाभ प्राप्त होतात ?

अ) तांत्रिक ब) व्यवस्थापकीय क) भांडवलविषयक ड) वरील सर्व

**10)** मागणीच्या लवचिकतेची संकल्पना पुढीलपैकी कोणी मांडली आहे ?

अ) प्रा. पिगु ब) □डम स्मिथ क) डॉ मार्शल ड) रिकार्डो

**11)** मागणीची लवचिकता ही मागणी होणाऱ्या बदलाचे.......... मापन करते.

अ) गुणात्मक ब) संख्यात्मक क) वस्तुनिष्ठ ड) व्यक्तिनिष्ठ

**12)** डॉ मार्शल यांनी मागणीच्या लवचिकतेचे पुढीलपैकी कोणते प्रकार स्पष्ट केले आहेत ?

अ) किंमत लवचिकता ब) उत्पन्न लवचिकता क) छेदक लवचिकता ड) वरीलपैकी सर्व

**13)** वस्तूंच्या किमतीत होणाऱ्या बदलामुळे वस्तूच्या मागणीत जो बदल होतो त्या बदलात्या प्रमाणास मागणीची......... लवचिकता असे म्हणतात.

अ) किंमत लवचिकता ब) उत्पन्न लवचिकता क) छेदक लवचिकता ड) पर्यायिता लवचिकता

**14)** मागणीची किंमत लवचिकता = ..........शेकडा बदल ÷ किमतीतील शेकडा बदल

अ) पुरवठ्यातील ब) मागणीतील क) उत्पन्नातील ड) खर्चातील

**15)** डॉ मार्शल यांनी मागणीच्या किंमत लवचिकतेचे किती प्रकार सांगितले आहेत ?

अ) तीन ब) चार क) पाच ड) सहा

**16)** उपभोक्त्याच्या उत्पन्नातील बदलामुळे जेव्हा वस्तूच्या मागणीत प्रमाणशीर बदल होतो तेव्हा त्यास मागणीची......... लवचिकता असे म्हणतात.

अ) किंमत लवचिकता ब) उत्पन्न लवचिकता क) छेदक लवचिकता ड) पर्यायिता लवचिकता

**17)** मागणीची उत्पन्न लवचिकता = मागणीतील शेकडा बदल ÷ .......... शेकडा बदल

अ) पुरवठ्यातील ब) मागणीतील क) उत्पन्नातील ड) खर्चातील

18) एका वस्तूच्या किंमतीत होणाऱ्या बदलामुळे दुसऱ्या वस्तूची किंमत स्थिर असूनही दुसऱ्या वस्तुच्या मागणीत बदल होतो त्या बदलाच्या प्रमाणास मागणीची ......... लवचिकता असे म्हणतात.

अ) किंमत लवचिकता ब) उत्पन्न लवचिकता क) छेदक लवचिकता ड) पर्यायता लवचिकता

19) छेदक लवचिकता = X वस्तूच्या मागणीतील शेकडा बदल ÷ Y वस्तूच्या ..........शेकडा बदल

अ) पुरवठ्यातील ब) मागणीतील क) उत्पन्नातील ड) खर्चातील

20) वस्तूच्या किमतीतील बदलापेक्षा मागणीतील बदल जेव्हा जास्त असतो तेव्हा त्या वस्तूची मागणी......... लवचिक असते.

अ) जास्त ब) कमी क) एकक ड) पूर्ण

21) आभास खंडाची संकल्पना पुढीलपैकी कोणी मांडले आहे ?

अ) प्रा. पिगु ब) □डम स्मिथ क) डॉ मार्शल ड) रिकार्डो

22) डॉ मार्शल यांच्या मते अल्पकाळात भूमी व्यतिरिक्त इतर उत्पादन घटकांना जे जास्तीचे उत्पन्न मिळते त्यास.........असे म्हणतात.

अ) लाभ ब) नफा क) व्याज ड) आभास खंड

23) डॉ मार्शल यांच्या मते खंडाची निर्मिती..........काळामध्ये होते.

अ) दीर्घ ब) अल्प क) अति दीर्घ ड) भविष्य

24) डॉ मार्शल यांच्यामते अल्पकाळात उत्पादन घटकांचा पुरवठा............असल्यामुळे उत्पादन घटकांना आभास खंड प्राप्त होतो.

अ) पूर्ण लवचिक ब) अलवचिक क) जास्त लवचिक ड) कमी लवचिक

25) पर्यायता लवचिकता = दोन वस्तूंच्या मागणीतील शेकडा बदल ÷ दोन वस्तूंच्या..................शेकडा बदल

अ) पुरवठ्यातील ब) मागणीतील क) उत्पन्नातील ड) किमतीतील

**उत्तरे**

**1-क, 2-अ, 3-क, 4-ब, 5-अ, 6-क, 7-ब, 8-क, 9-ड, 10-क, 11-ब, 12-ड, 13-अ, 14-ब, 15-क, 16-ब, 17-क, 18-क, 19-ब, 20-अ, 21-क, 22-ड, 23-ब, 24-ब, 25-ड**

## मॉड्युल - II

## भारतीय आर्थिक विचार

**1)** महात्मा फुले यांनी ........ मध्ये पुणे येथे मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली.

अ) सन **1845** ब) सन **1846** क) सन **1847** ड) सन **1848**

**2)** महात्मा फुले यांनी .............शिक्षण सक्तीचे असावे असे मत मांडले आहे.

अ) प्राथमिक ब) माध्यमिक क) उच्च ड) वरीलपैकी सर्व

**3)** महात्मा फुले यांच्या मते शिक्षक हा मूलतः.......... असावा.

अ) व्यवसायिक ब) उद्योजक क) शेतकरी ड) व्यापारी

**4)** महात्मा फुले यांच्यामते .............शिवाय बहुजन समाजाचा विकास होणार नाही.

अ) उद्योग ब) शेती क) शिक्षण ड) व्यापार

**5)** पुढीलपैकी कोणत्या पुस्तकांमध्ये महात्मा फुले यांनी शेती आणि शेतकऱ्यांच्या वाईट परिस्थिती विषयी विचार मांडले आहेत**?**

अ) गुलामगिरी ब) इशारा क) शेतकऱ्यांचा आसूड ड) ब्राह्मणांचे कसब

**6)** शेती आणि शेतकरी यांची दुरावस्था नाहीशी करण्यासाठी शेतकऱ्यांना............आवश्यकता आहे असे महात्मा फुले यांना वाटते.

अ) पैशाची ब) शिक्षणाची क) भांडवलाची ड) उद्योगाची

**7)** महात्मा फुले यांच्या मते..............यांच्याकडून शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात पिळवणूक व शोषण केले जाते.

अ) धर्माचे ठेकेदार ब) नोकरशहा क) सावकार ड) वरीलपैकी सर्व

**8)** पुढीलपैकी कोणी प्राथमिक शिक्षण आपल्या संस्थानांमध्ये सक्तीची केले **?**

अ) महात्मा फुले ब) राजर्षी शाहू महाराज क) सयाजीराव गायकवाड ड) डॉ बाबासाहेब आंबेडकर

**9)** संस्थानातील शेतकऱ्यांना आधुनिक शेती विषयी माहिती व्हावी यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानांमध्ये.................... ची स्थापना केली.

अ) राजाराम कॉलेज ब) दि किंग एडवर्ड □ग्रिकल्चरल इन्स्टिट्यूट क) व्हिक्टोरिया कॉलेज ड) वरीलपैकी सर्व

**10)** शेतकऱ्यांना अल्प व्याजदरात कर्ज पुरवठा उपलब्ध व्हावा यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी पुढीलपैकी कोणत्या फंडाची स्थापना केली ?

अ) शेतकरी ब) कृषी क) व्हिक्टोरिया मेमोरियल ड) वरीलपैकी सर्व

**11)** शेतकऱ्यांना शेतीच्या आधुनिक स्वरूपाची माहिती व्हावी यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात......... भरविण्यास सुरुवात केली.

अ) शेतकरी मेळावे ब) शेती प्रदर्शने क) शेती कार्यशाळा ड) वरीलपैकी सर्व

**12)** राजश्री शाहू महाराजांनी..................येथे पहिले शेती प्रदर्शन भरविले.

अ) कोल्हापूर ब) चिंचली क) निपाणी ड) बेळगाव

**13)** शेतीला मुबलक पाणीपुरवठा व्हावा या उद्देशाने राजश्री शाहू महाराजांनी पुढीलपैकी कोणत्या धरण प्रकल्पाची उभारणी केली.

अ) कोयना ब) नाथ सागर क) राधानगरी ड) शिवसागर

**14)** राजर्षी शाहू महाराजांनी शेतीबरोबरच पुढीलपैकी कोणत्या जोडव्यवसायांना उत्तेजन व प्रोत्साहन दिले ?

अ) कुकुट पालन ब) शेळीपालन क) रेशीम उद्योग ड) वरीलपैकी सर्व

**15)** शेतकरी वर्गाचे सावकार, दलाल, व्यापारी यांच्याकडून होणारे शोषण थांबवण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या मध्ये एकी निर्माण व्हावी यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी.............कायदा लागू केला

अ) कृषी कायदा ब) शेतकरी विकास कायदा क) सहकारी कायदा ड) कृषी विकास कायदा

**16)** डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्यामते..............ही भारतीय शेतीची प्रमुख समस्या आहे.

अ) भांडवलाची टंचाई ब) जलसिंचन सुविधांचा अभाव क) लहान धारण क्षेत्र ड) वाढती लोकसंख्या

**17)** पुढीलपैकी कोणत्या कारणामुळे जमिनीचे तुकडीकरण होत आहे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना वाटते.

अ) वारसा हक्क ब) शेतीवरील लोकसंख्येचा अतिरिक्त ताण क) बेरोजगारी ड) दारिद्र्य

**18)** शेतजमिनीचे तुकडीकरण होऊ नये यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पुढील पैकी कोणते उपाय सांगितले आहेत ?

अ) सामुदायिक शेती ब) सहकारी शेती क) औद्योगीकरण ड) वरीलपैकी सर्व

**19)** डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी पुढीलपैकी कोणत्या पद्धती विरुद्ध आवाज उठविला.

अ) महार वतन पद्धती   ब) खोती पद्धती   क) अस्पृश्यता   ड) वरीलपैकी सर्व

**20)** डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी पुढील पैकी कोणत्या ग्रंथांमध्ये भारतीय चलनाच्या समस्येविषयी विचार मांडले आहेत **?**

अ) द प्रॉब्लेम ऑफ द मनी   ब) द प्रॉब्लेम ऑफ द करन्सी   क) द प्रॉब्लेम ऑफ द रुपी   ड) द प्रॉब्लेम ऑफ द इंडियन करन्सी

**21)** भारतीय चलनाच्या समस्या सोडवण्यास पुढीलपैकी........ चलन पद्धती अयोग्य आहे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना वाटते.

अ) सुवर्ण विनिमय परिमाण   ब) सुवर्ण परिमाण   क) किमान सुवर्ण परिमान   ड) कमाल सुवर्ण परिमाण

**22)** आर्थिक निस्सारणाचा सिद्धांत कोणी मांडला आहे **?**

अ) डॉ बाबासाहेब आंबेडकर   ब) महात्मा फुले   क) दादाभाई नौरोजी   ड) महात्मा गांधी

**23)** दादाभाई नौरोजी यांच्यामते ब्रिटिशांनी पुढील मार्गाने भारताचे आर्थिक शोषण केले **?**

अ) गृहखर्च   ब) युद्धावरील खर्च   क) कर्जावरील व्याज   ड) वरीलपैकी सर्व

**24)** ब्रिटिशांनी केलेल्या आर्थिक शिक्षणाचे भारतावर पुढीलपैकी कोणते परिणाम झाले **?**

अ) दारिद्र्य आणि बेकारी वाढ   ब) उद्योगांचा ऱ्हास   क) शेतीप्रधान अर्थव्यवस्था   ड) वरीलपैकी सर्व

**25)** पुढीलपैकी कोणत्या ग्रंथांमध्ये दादाभाई नौरोजी यांनी आर्थिक निस्सारणाचा सिद्धांत मांडला आहे **?**

अ) पॉवर्टी अँड अनब्रिटिश रुल इन इंडिया   ब) पॉवर्टी अँड ब्रिटिश रुल इन इंडिया   क) द प्रॉब्लेम ऑफ इंडियन इकॉनोमी   ड) द प्रॉब्लेम ऑफ इंडियन करन्सी

**उत्तरे**

**1-ड, 2-अ, 3-क, 4-क, 5-क, 6-ब, 7-ड, 8-ब, 9-ब, 10-क, 11-ब, 12-ब, 13-क, 14-ड, 15-क, 16-क, 17-ड, 18-ड, 19-ब, 20-क, 21-अ, 22-क, 23-ड, 24-ड, 25-अ**

## मॉड्युल - III

## महात्मा गांधीचे आर्थिक विचार

1) महात्मा गांधी यांचे आर्थिक विचार पुढीलपैकी कोणत्या नेतिक मूल्यावर आधारित आहेत ?

अ) साधेपणा ब) अहिंसा क) मानवता ड) वरीलपैकी सर्व

2) महात्मा गांधींनी पुढीलपैकी कोणत्या उद्योगांना विरोध दर्शविला आहे ?

अ) लघुउद्योग ब) मोठे उद्योग क) सार्वजनिक उद्योग ड) खाजगी उद्योग

3) महात्मा गांधी यांच्या मते मोठ्या उद्योगामुळे पुढील समस्या निर्माण होतात.

अ) आर्थिक ब) सामाजिक क) राजकीय ड) वरीलपैकी सर्व

4) महात्मा गांधी यांच्या मते उद्योगांचे ..................होणे आवश्यक आहे.

अ) केंद्रीकरण ब) विकेंद्रीकरण क) खाजगीकरण ड) राष्ट्रीयीकरण

5) महात्मा गांधी यांनी आपल्या आर्थिक विचारांमध्ये पुढील पैकी कोणत्या गोष्टींना अधिक महत्त्व दिले आहे ?

अ) पैसा व संपत्ती ब) उद्योग व व्यापार क) नैतिक आणि मानवी मूल्ये ड) आधुनिकता व यांत्रिकीकरण

6) महात्मा गांधी यांच्या मते भारतासारख्या गरीब देशांचा विकास करण्यासाठी............ उद्योगांना संरक्षण दिले पाहिजे.

अ) मोठ्या ब) लघु व ग्रामोद्योग क) खाजगी ड) मूलभूत

7) महात्मा गांधी यांनी सर्वोदय संकल्पना कोणत्या पुस्तकावरून मांडली आहे ?

अ) किंगडम ऑफ गॉड ब) अन टू धिस लास्ट क) हिंद स्वराज ड) यंग इंडिया

8) ............ विकास झाल्याशिवाय भारताचा विकास होणार नाही असे महात्मा गांधी यांना वाटते.

अ) शहरांचा ब) खेड्यांचा क) समाजाचा ड) राज्यांचा

9) महात्मा गांधी यांनी ............खेड्यांची संकल्पना मांडली.

अ) आधुनिक ब) प्रगतशील क) आदर्श ड) स्वावलंबी

10) पुढीलपैकी कोणी ग्रामस्वराज्याची संकल्पना मांडली आहे ?

अ) महात्मा फुले ब) डॉ बाबासाहेब आंबेडकर क) महात्मा गांधी ड) राजर्षी शाहू महाराज

11) महात्मा गांधींना आदर्श खेड्यांच्या संकल्पनेत पुढीलपैकी कोणत्या गोष्टी अभिप्रेत आहेत ?

अ) व्यवस्थाबद्ध व नीटनेटकी रचना ब) आर्थिक स्वयंपूर्णता क) मूलभूत सुविधा ड) वरीलपैकी सर्व

**12)** महात्मा गांधींनी ग्राम विकासाच्या संकल्पनेत कोणत्या घटकांना महत्त्व दिले आहे **?**

अ) ग्रामउद्योगांचा विकास   ब) मूलभूत शिक्षण क) आर्थिक समानता    ड) वरीलपैकी सर्व

**13)** आदर्श खेड्यांची संकल्पना पुढीलपैकी कोणी मांडली आहे **?**

अ) महात्मा फुले ब) डॉ बाबासाहेब आंबेडकर क) महात्मा गांधी    ड) राजर्षी शाहू महाराज

**14)** महात्मा गांधी यांनी पुढीलपैकी कोणत्या प्रकारच्या समाज रचनेला महत्त्व दिले आहे **?**

अ) भांडवल प्रधान ब) श्रमप्रधान  क) कृषिप्रधान    ड) यंत्रप्रधान

**15)** पुढीलपैकी कोणत्या पाश्चात्त्य विचारवंतांचा प्रभाव महात्मा गांधी यांच्या जीवनावर पडलेला आहे **?**

अ) टॉलस्टॉय   ब) रस्किन   क) थोरो    ड) वरीलपैकी सर्व

**16)** महात्मा गांधी यांच्या मते ............म्हणजे सर्वोदय होय.

अ) सर्वांची कल्याण  ब) सर्वांचा विकास क) सर्वांची प्रगती   ड) वरीलपैकी सर्व

**17)** महात्मा गांधींना सर्वोदय संकल्पनेत कोणत्या गोष्टी अभिप्रेत आहेत **?**

अ) आर्थिक स्वावलंबन ब) समान संधी क) सत्तेचे विकेंद्रीकरण    ड) वरीलपैकी सर्व

**18)** भारतातील बेकारी आणि दारिद्र्य दूर होण्यासाठी.......... उद्योगांचा विकास होणे आवश्यक आहे असे महात्मा गांधींना वाटते.

अ) भांडवलप्रधान   ब) श्रमप्रधान   क) मोठ्या    ड) मूलभूत

**19)** महात्मा गांधी यांच्या मते श्रीमंतांनी आपल्या संपत्तीचा वापर......... म्हणून करावा.

अ) मालक   ब) विश्वस्त   क) श्रीमंत    ड) सेवक

**20)** समाजातील आर्थिक विषमता नाहीशी करण्यासाठी महात्मा गांधींनी पुढीलपैकी कोणती संकल्पना मांडली आहे **?**

अ) सर्वोदय   ब) वर्ग समन्वय   क) विश्वस्त    ड) ग्रामस्वराज्य

**उत्तरे**

**1**-ड, **2**-ब, **3**-ड, **4**-ब, **5**-क, **6**-ब, **7**-ब, **8**-ब, **9**-क, **10**-क, **11**-ड, **12**-ड, **13**-क, **14**-ब, **15**-ड, **16**-ड, **17**-ड, **18**-ब, **19**-ब, **20**-ब

प्रा. अनिल सुतार
अर्थशास्त्र विभाग
(महिला महाविद्यालय कराड)